॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/५५३ दिनांक २०/०२/२०२४

**परिपत्रक**

प्रति,
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) अतिरिक्त गुणवाढीबाबत असलेल्या नियमावलीतील रक्तदानाची अट रद्द करणे बाबत.

संदर्भ: सभा व निवडणुक विभागयांचे जा. क्र. सभा व नि/विद्यापरिषद बैठक–५८/२०२३–२ ४/८८३ दिनांक १२/०२/२०२४,

महोदय,

उपरोक्त विषयी सभा व निवडणूक विभाग प्रस्तुत विद्यापीठ यांच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने दिनांक २४/०१/२०२४ रोजी आयोजित मा. विद्यापरिषद बैठकीत विषय क्रमांक ०३/५८–२०२४ अन्वये राष्ट्रीय सेवा योजना, क्रिडा व विद्यार्थी कल्याण अंतर्गत विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त गुणदानाबाबत विषय ठेवण्यात आला होता त्या नुसार सदरील विषयावर खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.

**अ) विद्यार्थी विकास विभाग, क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व अविष्कार या अंतर्गत येणा–या उपक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या**
**नियमित विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर अतिरिक्त गुण देण्यात यावेत, असे सर्वानुमते ठराव झाला आहे.**

**ब) राष्ट्रीय सेवा योजना अतिरीक्त गुणाबाबत असलेल्या नियमावलीतील रक्तदानाची अट रद्द करण्यात यावी असे सवानुमते ठराव झाला आहे.**

तरी उपरोक्त मा विद्यापरिषद बैठकीतील ठरावाच्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालया मार्फत रा.से.यो. विभागात सादर होणा–या पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षातील विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणवाढ नियमावलीतील मुद्दा क्रमांक २ मध्ये रक्तदान करणे आवश्यक असल्याबाबत ची अट उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने रद्द करण्यात येत आहे. तरी त्या नुसार प्रोत्साहनपर अतिरिक्त गुणवाढीचे प्रस्ताव सादर करताना विना रक्तदान प्रमाणपत्र रा.से.यो. विभागात सादर करण्यात यावेत, ही विनंती.

**डॉ.मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.